Shreyas
SHIPPING & LOGISTICS LTD

Ref No: SSLL/24/2024-2025

Date: 06th July 2024

| | |
|---|---|
| Department of Corporate Services<br>**BSE Limited**<br>Corporate Relations Department<br>Phiroze Jeejeebhoy Towers<br>Dalal Street, Mumbai 400 001 | Listing Compliance<br>**National Stock Exchange of India Limited**<br>Exchange Plaza<br>Bandra Kurla Complex<br>Bandra (E), Mumbai 400 051 |
| **BSE Scrip Code: 520151** | **NSE Symbol: SHREYAS** |

Dear Sir,

**Subject: Submission of Newspaper Advertisement published in connection with Completion of the dispatch of Postal Ballot Notice**

Pursuant to Regulation 30 and Part A of Schedule III of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations 2015, please find the enclosed herewith the copies of the Advertisements published in Financial Express (English) & Loksatta (Marathi) on 06th July 2024.

The above Notice is also being made available on the Company's website at https://www.transworld.com/shreyas-shipping-and-logistics/.

Kindly take the same on record.

Thanking you,

Yours faithfully,
**For SHREYAS SHIPPING AND LOGISTICS LIMITED**

NAMRATA ASHISH MALUSHTE
Digitally signed by NAMRATA ASHISH MALUSHTE
Date: 2024.07.06 14:23:38 +05'30'

**NAMRATA MALUSHTE**
**COMPANY SECRETARY & COMPLIANCE OFFICER**

**Encl: As above**

D - 301 - 305, E-312A, F301-302, Level 3, Tower II, Seawoods Grand Central, Plot No. R1, Sector - 40, Nerul Node, Navi Mumbai 400 706.
Tel.: +91 22 6811 0300 Fax.: +91 22 6811 0333 CIN NO.: L63000MH1988PLC048500
Regd. Office: D-301-305, Level 3, Tower II, Seawoods Grand Central, Plot No. R1, Sector-40, Nerul Node, Navi Mumbai - 400 706.
Tel: +91 22 6811 0300 investor.ssll@transwold.com transworld.com/shreyas

a member of transworld GROUP

## बिहारमध्ये १४ अभियंत्यांचे निलंबन

**पाटणा :** बिहारमध्ये गेल्या १७ दिवसांत पूल कोसळण्याच्या झालेल्या १० घटनांनंतर सरकारने शुक्रवारी १४ अभियंत्यांना निलंबित केले, अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. एका चौकशी समितीने जलसंपदा विभागाला अहवाल सादर केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. ''अभियंते निष्काळजी होते आणि देखरेख कुचकामी असल्याचे आढळून आले. राज्यातील छोटे पूल आणि कॉजवे कोसळण्यामागे हेच मुख्य कारण आहे,'' असे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

## मोईत्रांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय महिला आयोगाने आयोगाच्या अध्यक्षा रेखा शर्मा यांच्यावर केलेल्या कथित आक्षेपार्ह टिप्पणीची दखल घेत तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्याची मागणी केली आहे. समाज माध्यमांवर पोस्ट केलेल्या व्हीडिओनंतर मोईत्रा यांनी केलेल्या टिप्पणीची दखल आयोगाने घेतली आहे. या व्हीडिओत उत्तर प्रदेशातील हाथरस येथे झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनास्थळी आयोगाच्या अध्यक्षा पोहोचल्याचे दिसत होत्या. त्यावेळी महुआ मोईत्रा यांनी कथित आक्षेपार्ह टिप्पणी केली होती.

## त्रिपुरामध्ये पाच रोहिंग्यांना अटक

**आगरतळा :** बांगलादेशातून वैध कागदपत्रांशिवाय भारतात प्रवेश केल्याप्रकरणी तीन महिलांसह पाच रोहिंग्यांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी शुक्रवारी ही माहिती दिली. उत्तर त्रिपुराच्या चुराईबारी भागात नियमित तपासणी दरम्यान, पोलिसांच्या पथकाने गुवाहाटीकडे जाणारी बस थांबवली आणि प्रवाशांना स्वतःची ओळख सांगण्यास सांगितले, परंतु पाच रोहिंग्या त्यांच्या राष्ट्रीयत्वाचा कोणताही पुरावा देऊ शकले नाहीत, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

# ढासळत्या अर्थव्यवस्थेचा फटका

## ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांच्या पराभवात आरोग्यसेवा, निर्वासितांचा प्रश्न प्रमुख कारणे



**वृत्तसंस्था, लंडन**

**ब्रिटनमध्ये** १४ वर्षे सत्तेत राहिल्यानंतर, पंतप्रधान ऋषी सुनक यांच्या नेतृत्वाखालील हुजूर पक्षाला गुरुवारी झालेल्या संसदीय निवडणुकीत दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. अर्थव्यवस्थेच्या स्थितीपासून ते आरोग्यसेवेपर्यंत पक्षाची सत्ता गमावण्याची काही प्रमुख कारणे आहेत.

देशातील अनेक जटिल प्रश्न सोडविण्यात आलेले अपयश, सातत्याने नेतृत्वबदल, पक्षांतर्गत मतभेद, पक्षफुटी अशा अनेक आघाड्यांवर अपयशी ठरलेल्या हुजूर पक्षाला ब्रिटिश मतदारांनी सत्तेतून खाली खेचले.

### भारतीय वंशाच्या उमेदवारांची विक्रमी कामगिरी

संसदेच्या हाऊस ऑफ कॉमन्सच्या निवडणुकीत भारतीय वंशाचे जवळपास २८ उमेदवार या निवडणुकीत विजयी झाले आहेत. त्यामध्ये हुजूर पक्षाच्या ऋषी सुनक, सुलेला ब्रेव्हरमॅन, प्रिती पटेल, क्लेअर कॉटिन्हो, गगन मोहिंद्रा, शिवानी राजा यांचा समावेश आहे. तर, शैलेश व्हारासारखे काही महत्त्वाचे सदस्य पराभूत झाले. व्हारा यांना भारतीय वंशाच्या मजूर पक्षाच्या अमीत जोगिया यांनी पराभूत केले. मजूर पक्षाचे सर्वाधिक भारतीय वंशाचे उमेदवार जिंकले. त्यामध्ये सीमा मल्होत्रा, वलेरी वाझ, लिसा नंदी, प्रीत कौर गिल, तनमनजीत सिंग धेसी यांचा समावेश आहे. त्याशिवाय मजूर पक्षाच्याच जस अठवाल, बॅगी शंकर, सतवीर कौर, हरप्रीत उप्पल, वारिंदर जस, गुरिंदर जोसन, कनिष्क नारायण, सोनिया कुमार, सुरीना ब्रॅकनब्रिज, किरीथ एन्टविसल, जीवन संधर आणि सोजन जोसेफ हेही विजयी झाले.

### भारताबरोबर 'एफटीए'च्या शक्यतेत वाढ

नवी दिल्ली : ब्रिटनमध्ये सत्तांतर झाल्याचा भारताला व्यापारामध्ये फायदा होण्याची आशा वाढली आहे. मजूर पक्ष सत्तेवर आल्यामुळे आता दोन्ही देशांदरम्यान प्रस्तावित मुक्त व्यापार कराराला (एफटीए), थोड्या बदलांसह मंजुरी मिळण्याची शक्यता आहे असे मत 'ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह' (जीटीआरआय) या आर्थिक विचार गटाने व्यक्त केले आहे. जीटीआरआये संस्थापक अजय श्रीवास्तव यांनी अशी अपेक्षा व्यक्त केली की, भारताबरोबरच्या 'एफटीए'मुळे ब्रिटनमधील निर्यातदारांना मोठ्या प्रमाणात मालांचे दर कमी होण्याचा फायदा होऊ शकतो ही बाब मजूर पक्ष लक्षात घेईल. या 'एफटीए'मुळे ब्रिटनचा भारताबरोबरचा व्यापार तातडीने वाढेल असे श्रीवास्तव म्हणाले. या कराराला जवळपास अंतिम स्वरूप मिळाले असून त्यामध्ये भारतीय व्यावसायिकांना द्यावयाच्या व्हिसांची संख्या कमी करण्यासारख्या काही तरतुदींमध्ये बदल करून मजूर पक्ष त्याला मंजुरी देईल अशी अपेक्षा 'जीटीआरआय' ने व्यक्त केली आहे.

गेल्या पाच वर्षांमध्ये तब्बल तीन पंतप्रधान देणाऱ्या हुजूर पक्षाच्या कार्यकाळात ब्रिटनच्या जनतेचे राहणीमान घसरले. सर्वसामान्य ब्रिटिश नागरिकांना किफायतशीर दरात उत्तम आरोग्य सेवा पुरवणाऱ्या 'नॅशनल हेल्थ सर्व्हिस'ची (एनएचएस) वाताहत झाली असून, डॉक्टरांच्या भेटीची वेळ मिळवण्यासाठी कित्येक महिने रखडावे लागत आहे. सत्ता सोडताना, नागरिकांचे जीवनमान खालावण्याची कामगिरी करणारा हुजूर पक्ष हा ब्रिटनमधील पहिला पक्ष ठरला.

सुनक यांना ब्रिटनची अर्थव्यवस्था रूळावर आणण्यात अपयश आले. ते पंतप्रधान झाल्यानंतर ते सर्वात प्रथम महागाई नियंत्रणात आणतील अशी अपेक्षा होती, पण तसे झाले नाही. याउलट ऑक्टोबर २०२२ मध्ये महागाई ४० वर्षांच्या उच्चांकावर पोहोचली, ती नुकतीच खाली आली आहे. परंतु यामुळे तेथील गरीब नागरिक संतप्त झाले आहेत. सार्वजनिक सेवा कोलमडल्या आहेत.

**निरोपाच्या वेळी सुनक भावूक**

पंतप्रधान म्हणून त्यांच्या निरोपाच्या भाषणात ऋषी सुनक भावूक झाले. त्यांनी मतदारांची आणि निवडणुकीत पराभूत झालेल्या आपल्या पक्षाच्या सहकाऱ्यांचीही त्यांनी माफी मागितली. सुनक म्हणाले, ''मी या पदावर पूर्ण प्रामाणिकपणे काम केले आहे, पण तुम्ही स्पष्ट संकेत दिलेत की ब्रिटिश सरकार बदलावे लागेल. तुमचा निर्णय महत्त्वाचा आहे. मी या पराभवाची जबाबदारी घेतो,'' असे सुनक म्हणाले. डाऊनिंग स्ट्रीट येथे आपल्या कुटुंबासोबत साजरी केलेल्या दिवाळीच्या आठवणीही त्यांनी सांगितल्या.

# सुनक यांचीच 'ब्रेग्झिट'!

(पान १ वरून)

ऑफ कॉमन्समध्ये किमान ३२६ जागा मिळवणे आवश्यक होते. तो आकडा मजूर पक्षाने अगदी आरामात पार केला. नवीन पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी दिलेल्या 'राष्ट्रीय नूतनीकरणा'च्या घोषणेला ब्रिटनच्या जनतेने भरभरून पाठिंबा दिल्याचे या निकालातून दिसते. आता बदलाला सुरुवात झाली आहे असे मत स्टार्मर यांनी निकालानंतर केलेल्या पहिल्या भाषणात व्यक्त केले. दरम्यान, सुनक यांनी उत्तर इंग्लंडमधील रिचमंड अँड नॉर्थआलर्टन या मतदारसंघात विजय मिळवला.

**कोण आहेत कीर स्टार्मर?**

हुजूर पक्षाची सत्ता संपुष्टात आणणारे मजूर पक्षाचे नेते कीर स्टार्मर यांचा लंडनजवळच्या सरे येथे एका कामगार कुटुंबात १९६३ साली जन्म झाला. कायद्याची पदवी घेतल्यानंतर १९८७ साली त्यांनी वकिली सुरू केली. जुलै २००८ मध्ये त्यांची स्कॉटलंड, इंग्लंड, वेल्सचे 'क्राऊन प्रॉसिक्युशन सर्व्हिस'चे प्रमुख आणि सार्वजनिक अभियोग संचालकपदी नियुक्ती झाली. त्यांनी वयाच्या पन्नाशीत राजकारणात प्रवेश केला. ते २०१५मध्ये हॉलबॉर्न अँड सेंट पँकर्स मतदारसंघातील पोटनिवडणुकीत सर्वप्रथम निवडून गेले.

> मजूर पक्षाने सार्वत्रिक निवडणुकीत विजय मिळवला आहे आणि मी सर कीर स्टार्मर यांचे विजयाबद्दल अभिनंदन करतो. आमच्या पक्षाचा पराभव झाला आहे आणि मी त्याची जबाबदारी स्वीकारतो.
> – ऋषी सुनक, नेते, हुजूर पक्ष

**नवीन सभागृहात**

| |
|---|
| मजूर - ४१२ |
| हुजूर - १२१ |
| लिबरल डेमोक्रॅट्स - ७१ |
| एसएनपी - ९, |
| एसएफ - ७, इतर - २८ |

# हाथरसमध्ये प्रशासनाची बेपर्वाई!

## राहुल गांधी पीडित कुटुंबांच्या भेटीला

**पीटीआय, हाथरस**

**लोकसभेतील विरोधी** पक्षनेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी सकाळी हाथरसला जाऊन चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेतील पीडितांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. घटना घडली तिथे प्रशासनाकडून निष्काळजीपणा झाला असे ते म्हणाले, पण या दुर्घटनेचे मला कोणतेही राजकारण करायचे नाही अशी पुस्ती त्यांनी जोडली. राज्याचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी पीडितांना कोणत्याही विलंबाविना जास्तीत जास्त नुकसानभरपाई द्यावी अशी मागणीही त्यांनी केली.

हाथरसमध्ये मंगळवारी बाबा भोले या स्वयंघोषित धार्मिक नेत्याच्या सत्संगाच्या वेळी झालेल्या चेंगराचेंगरीत १२१ जण ठार झाले होते. त्यामध्ये ११६ महिलांचा समावेश होता. राहुल गांधी यांनी भेट घेतलेल्या एका कुटुंबाच्या सदस्यांनी सांगितले की, भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी आपण हा मुद्दा संसदेत उपस्थित करू असे आश्वासन राहुल यांनी दिले आहे.



> राहुल गांधी आमच्याशी बोलले आणि त्यांनी सहानुभूती व्यक्त केली. पीडितांना मिळणारी नुकसानभरपाई वाढवण्यासाठी आपण प्रयत्न करू असे त्यांनी सांगितले.
> – हरी मोहन,

## आंध्रसाठी आर्थिक मदतीची मागणी

**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी शुक्रवारी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेतली. या वेळी त्यांनी कर्जात बुडालेल्या आंध्र प्रदेशला आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले.

सूत्रांनी सांगितले की, नॉर्थ ब्लॉकमध्ये झालेल्या बैठकीत नायडू यांनी केंद्राची तत्काळ मदत आवश्यक असणाऱ्या आंध्र प्रदेशात सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती दिली. 'मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या आर्थिक गरजा आणि निधी वाटप वाढवण्याच्या मागणी मागील तर्क मांडणारे तपशीलवार निवेदन सादर केले,' असे सूत्रांनी सांगितले.

# संरक्षण उत्पादनात यंदा विक्रमी वाढ

## संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांची माहिती; पंतप्रधान मोदींकडून प्रशंसा

**पीटीआय, नवी दिल्ली**

**भारताचे वार्षिक** संरक्षण उत्पादन २०२३-२४ मध्ये अंदाजे एक कोटी २७ लाख रुपयांवर पोहोचले आहे. मेक इन इंडिया कार्यक्रमाच्या माध्यमातून तयार झालेल्या उत्पादन मूल्याने विक्रमी उंची गाठली असल्याची माहिती संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी शुक्रवारी दिली. मागील वर्षी २०२२-२३ मध्ये हे संरक्षण उत्पादन मूल्य एक लाख ८ हजार ६८४ कोटी रुपये होते. यंदा यात १६.७ टक्के वाढ झाली आहे.

संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सर्व सार्वजनिक क्षेत्रातील संरक्षण उपक्रम, संरक्षण वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या इतर पीएसयू आणि खासगी कंपन्यांकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार, देशातील संरक्षण उत्पादनाचे मूल्य विक्रमी उच्चांकावर गेले आहे. २०२३-२४ मध्ये हे मूल्य एक लाख २६ हजार ८८७ कोटी रुपयांवर गेले. मागील आर्थिक वर्षाच्या संरक्षण उत्पादनाच्या तुलनेत यंदा ही वाढ १६.७ टक्के आहे. भारताला आत्मनिर्भर बनविण्याच्या दिशेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने घेतलेला पुढाकार आणि धोरणांची यशस्वी अंमलबजावणी यामुळे संरक्षण मंत्रालयाने या आर्थिक वर्षात मूल्याच्या दृष्टीने स्वदेशी संरक्षण उत्पादनात आतापर्यंतची सर्वोच्च वाढ साधली आहे.



> या कामगिरीत योगदान दिलेल्या सर्वांचे अभिनंदन. भारताची क्षमता आणखी वाढवण्यासाठी आणि देशाला जागतिक संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून प्रस्थापित करण्यासाठी आश्वासक वातावरण निर्माण करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. – नरेंद्र मोदी, पंतप्रधान


**Shreyas SHIPPING & LOGISTICS LTD**

**सीआयएन** : एल६३०००एमएच१९८८पीएलसी०४८५००
**नोंदणीकृत कार्यालय** : डी ३०१-३०५, लेव्हल ३, टॉवर II, सीवूड्स ग्रँड सेंट्रल, प्लॉट नं. आर१, सेक्टर ४०, नेरूळ नोड, नवी मुंबई-४००७०६.
**टेलि** : ०२२ ६८११ ०३०० **फॅक्स** : ०२२ ६८११ ०३३३
**ईमेल** : investor.ssll@transworld.com
**वेबसाइट** : https://www.transworld.com/shreyas-shipping-and-logistics.html

**पोस्टल बॅलटची सूचना व रिमोट ई-वोटिंग माहिती**

कंपनीच्या सदस्यांना याद्वारे कळविण्यात आले आहे की, निगम कामकाज मंत्रालयाद्वारा निर्गमित केलेले जनरल सर्क्युलर नं. १४/२०२० दिनांकित ०८ एप्रिल, २०२०, नं. १७/२०२० दिनांकित १३ एप्रिल, २०२०, नं. २२/२०२० दिनांकित १५ जून, २०२०, नं. ३३/२०२० दिनांकित २८ सप्टेंबर, २०२०, नं. ३९/२०२० दिनांकित ३१ डिसेंबर, २०२०, नं. ०२/२०२१ दिनांकित १३ जानेवारी, २०२१, नं. १०/२०२१ दिनांकित २३ जून, २०२१, नं. २०/२०२१ दिनांकित ०८ डिसेंबर, २०२१, नं. ०३/२०२२ दिनांकित ०५ मे, २०२२ व नं. ११/२०२२ दिनांकित २८ डिसेंबर, २०२२ व २५ सप्टेंबर, २०२३ (यापुढे "एमसीए सर्क्युलर्स म्हणून संदर्भित"), सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ ("लिस्टिंग रेग्युलेशन्स")च्या रेग्युलेशन ४४ आणि अन्य लागू कायदे, नियम व विनियम (समाविष्ट वेळोवेळी सुधारित केल्यानुसार आणि वेळेपुरते अंमलात आणलेल्या त्याकरिता कोणतेही सांविधिक फेरबदल किंवा पुनर्कायदे) यासह वाचलेल्या कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४च्या नियम २० व २२ आणि कंपन्या अधिनियम, २०१३ च्या कलम १०८ व ११०च्या अनुसार कंपनीने खालील बाबतीत, इलेक्ट्रॉनिक प्रणालीत पोस्टल बॅलटद्वारा तिच्या भागधारकांची मान्यता मिळविण्याकरिता अशा भागधारकांना, ज्यांची नावे बुधवार, ०३ जुलै २०२४ ("कट-ऑफ तारीख") रोजीप्रमाणे सदस्यांच्या नोंदवहीत आणि/ किंवा डिपॉझिटरीजद्वारा ठेवण्यात आलेल्या लाभाधिकारी मालकांच्या नोंदवहीत अभिलिखित आहेत, केवळ इलेक्ट्रॉनिक प्रणालीत शुक्रवार, ०५ जुलै, २०२४ रोजी पोस्टल बॅलटची सूचना पाठविली आहे.

| अनु. क्र. | ठरावाचा प्रकार | ठराव |
|---|---|---|
| १. | विशेष | कंपनीचे नाव "श्रेयस शिपिंग अँड लॉजिस्टिक्स लिमिटेड" यावरून "ट्रान्सवर्ल्ड शिपिंग लाईन्स लिमिटेड" असे बदलण्यास तसेच कंपनीच्या मेमोरंडम ऑफ असोसिएशन व आर्टिकल्स ऑफ असोसिएशनच्या परिणामी बदलास मान्यता. |

कंपनीने तिच्या सदस्यांना रिमोट ई-वोटिंग सुविधेच्या तरतुदीकरिता "मेसर्स लिंक इन्टाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड"च्या (लिंक इन्टाईम) सेवा नियुक्त केल्या आहेत. ई-वोटिंगकरिता सविस्तर प्रक्रिया पोस्टल बॅलटच्या सूचनेमध्ये नमूद केलेली आहे. रिमोट ई-वोटिंग कालावधी शनिवार, ०६ जुलै २०२४ रोजी स. १०.०० वा. (भाप्रवे) सुरू होईल आणि रविवार, ०४ ऑगस्ट, २०२४ रोजी सायं. ०५.०० वा. (भाप्रवे) संपेल. ई-वोटिंगकरिता रविवार, ०४ ऑगस्ट, २०२४ सायं. ०५.०० वा. (भाप्रवे) दरम्यान अनुमती दिली जाणार नाही, आणि ई-वोटिंग मोड्यूल त्यानंतर "लिंक इन्टाईम"द्वारा निःसमर्थ करण्यात येणार आहे. भागधारक ज्यांची नावे "कट-ऑफ" तारखेनुसार सदस्यांच्या नोंदवहीत किंवा डिपॉझिटरीजद्वारा ठेवण्यात आलेल्या लाभाधिकारी मालकांच्या नोंदवहीत आलेली आहेत तेच केवळ रिमोट ई-वोटिंगकरिता पात्र असणार आहेत. सदस्यांच्या मतदानाचा हक्क "कट-ऑफ" तारखेनुसार कंपनीच्या भरणा केलेल्या समभाग भांडवलातील त्यांच्याकडील असलेल्या भागांच्या प्रमाणशीर असणार आहे.

ज्या सदस्यांकडे डिमटेरियलाईज्ड स्वरूपात भाग आहेत त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सद्वारा त्यांच्या संबंधित डिपॉझिटरीजकडे त्यांचे ईमेल पत्ते व मोबाईल नंबर्सची नोंद करावी. ज्या सदस्यांकडे प्रत्यक्ष स्वरूपात भाग आहेत त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कंपनीचे रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजन्ट म्हणजेच "मेसर्स लिंक इन्टाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड", सी-१०१, २४७ पार्क, एल. बी. एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०० ०८३. टेलि नं. : ०२२ - ४९१८६२७०, फॅक्स नं. ०२२ - ४९१८६०६०, ईमेल : rnt.helpdesk@linkintime.co.in यांच्याकडे प्रत्यक्ष फॉर्म आयएसआर-१ व अन्य संबंधित फॉर्ममध्ये त्यांचे ईमेल पत्ते व मोबाईल नंबर्सची नोंद करावी.

पोस्टल बॅलट सूचना https://www.transworld.com/ shreyas-shipping-and-logistics.html या कंपनीच्या वेबसाइटवर आणि https://instavote.linkintime.co.in या "लिंक इन्टाईम"च्या वेबसाइटवर तसेच स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाइट्सवर जेथे कंपनीचे समभाग सूचीबद्ध आहेत म्हणजेच www.bseindia.com या बीएसई लिमिटेडच्या वेबसाइटवर आणि www.nseindia.com या नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

रिमोट ई-वोटिंग प्रक्रियेद्वारा होणाऱ्या पोस्टल बॅलटसंबंधित कोणत्याही शंका/ तक्रारी असल्यास, सदस्य संपर्क साधू शकतील - श्री. राजीव रंजन, सहाय्यक उपाध्यक्ष - ई-वोटिंग, "लिंक इन्टाईम" enotices@linkintime.co.in यावरून ईमेल द्वारा, टेलि : ०२२-४९१८ ६००० किंवा investor.ssll@transworld.com यावरून कंपनीशी.

पोस्टल बॅलटच्या मतदानाचा निकाल मंगळवार, ०६ ऑगस्ट, २०२४ रोजी किंवा तत्पूर्वी घोषित करण्यात येणार आहे.

परिनिरीक्षकांच्या अहवालासमवेत उक्त निकाल https://www.transworld.com/ shreyas-shipping-and-logistics.html या कंपनीच्या वेबसाइटवर अपलोड करण्यात येणार आहेत, आणि स्टॉक एक्सचेंजेसकडे सुद्धा पाठविण्यात येणार आहेत तसेच https://instavote.linkintime.co.in या "मेसर्स लिंक इन्टाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड"च्या वेबसाइटवर प्रस्तृत करण्यात येणार आहेत. कंपनी तिच्या नोंदणीकृत कार्यालयात तसेच कॉर्पोरेट कार्यालयात सुद्धा पोस्टल बॅलटचे निकाल प्रस्तुत करील.

संचालक मंडळाच्या आदेशाद्वारा
श्रेयस शिपिंग अँड लॉजिस्टिक्स लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
नम्रता मालुष्टे
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी

स्थळ : नवी मुंबई
दिनांक : ०५ जुलै, २०२४



**Oriental Aromatics Ltd.**

**सीआयएन :** एल१७२९९एमएच१९७२पीएलसी२८५७३१
**नोंदणी. कार्यालय :** १३३, जेहांगीर बिल्डींग, २ रा मजला, एम. जी. रोड, मुंबई ४००००१
**दूरध्वनी क्र.:** ०२२-४३२१४०००; **फॅक्स :** ०२२-४३२१ ४०९९
**ई-मेल :** investors@orientalaromatics.com **संकेतस्थळ :** www.orientalaromatics.com

**५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची जाहीर सूचना**

**प्रिय सभासदांनो,**

१. सूचना याद्वारे देण्यात येत आहे की, कंपनी कायदा, २०१३ आणि त्याअंतर्गत करण्यात आलेल्या नियमावली आणि सर्वसाधारण परिपत्रक दिनांकित एप्रिल ८, २०२०, एप्रिल १३, २०२०, मे ५, २०२०, डिसेंबर २८, २०२२ आणि त्यानंतर यासंदर्भात जारी करण्यात आलेले अखेरचे असलेले सप्टेंबर २५, २०२३ (संयुक्तपणे **एमसीए परिपत्रके** असा संदर्भ असलेले) आणि भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळद्वारे जारी करण्यात आलेले सेबी परिपत्रक दिनांकित मे १२, २०२०, जानेवारी १५, २०२१, मे १३, २०२२ आणि ऑक्टोबर ७, २०२३ (संयुक्तपणे **सेबी परिपत्रके** असा संदर्भ असलेले) सह वाचल्या जाणाऱ्या सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस) नियमावली, २०१५ अनुसार व्हिडियो कॉन्फरन्सिंग **('व्हीसी')** / अदर ऑडियो व्हिज्युअल मीन्स **('ओएव्हीएम')** सुविधेद्वारे कंपनीची ५२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **(५२ वी एजीएम)** बुधवार, २१ ऑगस्ट २०२४ रोजी स. ११.०० वा. घेण्यात येणार आहे.

२. **एजीएमच्या सूचनेच्या इलेक्ट्रॉनिक प्रतींची उपलब्धता :**
५२ व्या एजीएम आणि आर्थिक वर्ष २०२३-२०२४ करीता वार्षिक अहवालाच्या इलेक्ट्रॉनिक प्रती अशा सर्व सभासदांना ज्यांच्या ई-मेल आयडीची नोंद कंपनी/लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ('आरटीए')/नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरीज लिमिटेड **('एनएसडीएल')** किंवा सेन्ट्रल डिपॉझिटरीज सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड **('सीडीएसएल')** (एनएसडीएल आणि सीडीएसएल यांचा संयुक्तपणे 'डिपॉझिटरीज' असा संदर्भ असलेले) केली आहे, त्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात येईल. उपरोक्त नमूद एमसीए परिपत्रके आणि सेबी परिपत्रकांच्या अनुषंगाने वार्षिक अहवालाची प्रत्यक्ष प्रत असे समभागधारक, जे त्यासाठी विनंती करतील त्यांना प्रत्यक्ष पाठविण्यात येईल. ५२ व्या एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल कंपनीच्या संकेतस्थळावर म्हणजेच www.orientalaromatics.com वर आणि स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया म्हणजेच बीएसईच्या संकेतस्थळावर म्हणजेच www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया आणि एनएसडीएलचे संकेतस्थळ www.evoting.nsdl.com या संकेतस्थळावरदेखील उपलब्ध आहे.

३. **व्हीसी/ओएव्हीएमद्वारे आयोजित केल्या जाणाऱ्या एजीएममध्ये हजर राहण्याचे आणि मतदानाचे स्वरूप :**
सभासदांना एनएसडीएल ई-व्होटिंग सिस्टीमद्वारे व्हीसी/ओएव्हीएमद्वारे एजीएमला हजर राहण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. सभासद एनएसडीएल ई-व्होटिंग यंत्रणा वापरण्यासंदर्भात एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आलेल्या पद्धतीनुसार प्राप्त करू शकतील. यशस्वी लॉग इन केल्यानंतर कंपनीच्या नावासमोर 'जॉइन जनरल मिटिंग'अंतर्गत देण्यात आलेल्या व्हीसी/ ओएव्हीएम लिंक पाहू शकाल. तुम्हाला **'जॉइन जनरल मिटिंग'**अंतर्गत देण्यात आलेली व्हीसी/ ओएव्हीएम लिंकवर क्लिक करण्याची विनंती करण्यात येत आहे. व्हीसी/ ओएव्हीएमसाठी लिंक समभागधारक / सभासद यांच्यासाठी असलेले लॉग इन जेथे कंपनी नाव येईल. कृपया नोंद घेण्यात यावी की, ज्यांना ई-व्होटिंगसाठी युजर आयडी आणि पासवर्ड माहित नाही त्यांना सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या रिमोट ई-व्होटिंग सूचनांचे पालन करून प्राप्त करता येईल :

४. **समभागधारकांचे ई-मेल आयडी नोंद करण्यासाठी स्वरूप :**
सभासद ज्यांनी त्यांच्या ई-मेल आयडीची नोंद कंपनीकडे अद्याप केलेली नाही त्यांना एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्राप्त होण्यासाठी त्याच्या ई-मेल आयडीची नोंद मंगळवार ०६ ऑगस्ट २०२४ रोजी सायं. ५.०० वा. (भाप्रवे) पूर्वी खालील प्रक्रियेचा वापर करून करण्याची विनंती करण्यात येत आहे.
ए. **प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारण केलेले सभासद** त्यांच्या ई-मेल आयडीची लिंक इन टाइम इंडिया प्रा. लि. (आरटीए) यांच्याकडे त्यांच्या नोंद संकेतस्थळ www.linkintime.co.in वरील https://liiplweb.linkintime.co.in/EmailReg/Email_Register.html या लिंकवर क्लिक करून त्यांच्या ई-मेल आयडीची गुंतवणूकदार सेवा टॅबवर ई-मेल/बँक नोंदणी हेडिंग निवडून आणि त्यामध्ये मार्गदर्शन केल्याप्रमाणे नोंदणी प्रक्रिया फॉलो करून नोंदणी करू शकतात. वैकल्पिकरित्या, सदस्य योग्यरित्या भरलेला आणि स्वाक्षरी केलेला फॉर्म आयएसआर-१ सोबत पॅन कार्डची स्व-साक्षांकित प्रत, आणि कोणत्याही दस्तऐवजाची स्व-साक्षांकित प्रत (उदा.: आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, मतदार ओळखपत्र, पासपोर्ट) सबमिट करून ते अपडेट करू शकतात.) सभासदांच्या पत्त्याच्या समर्थनार्थ, लिंक इनटाइम इंडिया प्रा. लि., सी १०१ एम्बेसी २४७, एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०००८३ यांच्याकडे कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत, सदस्य आरटीए यांच्याशी rnt.helpdesk@linkintime.co.in वर ई-मेल पाठवू शकतात.
बी. **डीमॅट स्वरूपामध्ये कंपनीचे समभाग धारण करणाऱ्या कंपनीचे सभासद** त्यांचे ई-मेल पत्ते त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (DPs) किंवा लिंक इनटाइम इंडिया प्रा. लि. (आरटीए) यांच्याकडे लिंकवर क्लिक करून https:// liiplweb.linkintime.co.in/EmailReg/Email_Register.html त्यांच्या वेबसाइट www.linkintime.co.in वर गुंतवणूकदार सेवा टॅबवर ई-मेल नोंदणी हेडिंग निवडून आणि त्यामध्ये मार्गदर्शन केल्याप्रमाणे नोंदणी प्रक्रियेचे अनुसरण करून नोंदणी करू शकतात. नाव, डीपीआयडी, क्लायंट आयडी/पॅन, मोबाईल नंबर आणि ई-मेल आयडी यांसारखे तपशील प्रदान करण्याची विनंती केली जाते. कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत, सदस्य RTA ला rnt.helpdesk@linkintime.co.in वर ई-मेल पाठवू शकतो.
**भागधारकांचा तपशील सादर केल्यानंतर भागधारकांना एक ओटीपी प्राप्त होईल जो पडताळणीसाठी लिंकमध्ये प्रविष्ट करणे आवश्यक आहे.**
सभासद एजीएम सूचनेमध्ये प्रदान केलेल्या तपशीलवार प्रक्रियेचा संदर्भ घेऊ शकतात.

५. **ज्या सदस्यांनी कंपनीकडे त्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत त्यांच्यासाठी मीटिंगदरम्यान रिमोट ई-व्होटिंगद्वारे किंवा ई-व्होटिंग प्रणालीद्वारे मतदान करण्याची पद्धत :**
* प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण केलेले असल्यास फोलिओ क्रमांक, भागधारकाचे नाव, शेअर सर्टिफिकेटची स्कॅन केलेली प्रत (पुढे आणि मागे), पॅन (पॅन कार्डची स्वयं-प्रमाणित स्कॅन केलेली प्रत), आधार (स्वयं-प्रमाणित स्कॅन केलेली) आधार कार्डची प्रत) आमच्या आरटीए लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या लिंक यांच्या rnt.helpdesk@linkintime.co.in वर ईमेलद्वारे किंवा investors@orientalaromatics.com वर पाठवावे.
* समभाग धारणा डिमॅट स्वरूपात असल्यास, कृपया डीपीआयडी-सीएलआयडी (१६ अंकी डीपीआयडी + सीएलआयडी किंवा १६ अंकी लाभार्थी आयडी), नाव, क्लायंट मास्टर किंवा एकत्रित खाते विवरणाची प्रत, पॅन (पॅन कार्डची स्वयं-प्रमाणित स्कॅन केलेली प्रत) प्रदान करा. आधार (आधार कार्डची स्वयं प्रमाणित स्कॅन प्रत) आरटीए लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या लिंक rnt.helpdesk@linkintime.co.in वर किंवा investors@orientalaromatics.com वर पाठवावे.

सदस्यांनी त्यांचे ई-वोटिंग लॉगीन क्रेडेन्शियल मिळविण्यासाठी एजीएम सूचनेमध्ये नमूद केलेल्या तपशीलवार सूचना वाचण्याची विनंती केली जाते.

६. **लाभांश प्राप्त करण्यासाठी बँक तपशील अद्ययावत करण्यासह KYC नोंदणी करण्याची पद्धत :**
* सेबी परिपत्रक दिनांकित ३ नोव्हेंबर २०२१ अनुसार या संदर्भात जारी केलेल्या त्यानंतरच्या परिपत्रकांसह वाचल्या जाणाऱ्या, प्रत्यक्ष स्वरूपात भागधारणा करणाऱ्या धारकांना पॅन, केवायसी तपशील आणि नामांकनाची नोंदणी अनिवार्य केली आहे. उक्त आदेशानुसार, भौतिक स्वरूपात सिक्युरिटीज धारण करणारे सदस्य, ज्यांचे फोलिओ कोणत्याही केवायसी तपशिलांसह अपडेट केलेले नाहीत [उदा. (i) पॅन; (ii) नामांकनाची निवड; (iii) संपर्क तपशील; (iv) मोबाइल क्रमांक; (v) बँक खात्याचे तपशील आणि (vi) स्वाक्षरी अशा फोलिओच्या संबंधात लाभांश, व्याज किंवा पूर्तता यासह कोणत्याही पेमेंटसाठी पात्र असेल, फक्त १ एप्रिल २०२४ पासून इलेक्ट्रॉनिक मोडद्वारे. केवायसी तपशील लवकरात लवकर अयशस्वी झाल्यास लाभांश रोखला जाईल, जोपर्यंत केवायसी तपशील अपडेट केले जात नाहीत.
* प्रत्यक्ष स्वरूपात भागधारण करणाऱ्या सभासदांनी त्यांचे पॅन, केवायसी आणि नामांकन तपशील, योग्यरित्या भरलेला आणि स्वाक्षरी केलेला फॉर्म आयएसआर-१, आयएसआर -२, आयएसआर -३ किंवा एसएच-१३, लागू असल्याप्रमाणे, लिंक इन टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, सी-१०१ एम्बेसी २४७, एल.बी एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०००८३ यांच्याकडे पाठविण्याची विनंती करण्यात येत आहे.
* डिमटेरिअलाइज्ड स्वरूपामध्ये भागधारण करणाऱ्या सदस्यांना डिव्हिडंड प्राप्त होण्यास विलंब टाळण्यासाठी त्यांचे संपूर्ण बँक तपशील त्यांच्या डीपीसोबत अपडेट करण्याची विनंती करण्यात येत आहे.

७. **लाभांश आणि बुक क्लोजर :**
सभासदांनी कृपया नोंद घ्यावी की २७ मे २०२४ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत रु. ५/- प्रत्येकीच्या समभागांवर ०.५०/- प्रति समभाग (१०%) लाभांशाची शिफारस केली आहे. एजीएममध्ये घोषित केल्यास लाभांश सोमवार, २६ ऑगस्ट २०२४ रोजी किंवा त्यानंतर कट-ऑफ दिनांक म्हणजेच मंगळवार, ६ ऑगस्ट २०२४ रोजी ज्या सदस्यांची नावे सभासदांच्या नोंदणीमध्ये दिसतील, त्यांना स्त्रोतावरील कर कपातीच्या अधीन राहून (टीडीएस) दिला जाईल. म्हणजे पुस्तक बंद होण्याच्या तारखा सुरू होण्याच्या एक दिवस आधी. बुधवार, ७ ऑगस्ट २०२३ ते बुधवार, २१ ऑगस्ट २०२३ (दोन्ही दिवस धरून) या कालावधीत सदस्यांची नोंदणी आणि कंपनीचे शेअर ट्रान्स्फर बुक्स बंद राहतील (दोन्ही दिवसांसह). कोणत्याही शंका असल्यास, तुम्हाला आमच्या आरटीए यांच्याशी rnt.helpdesk@linkintime.co.in वर लिहिण्याची विनंती केली जाते किंवा गुंतवणूकदारांच्या ईमेल आयडीवर म्हणजेच investors@orientalaromatics.com.

८. **लाभांशावरील कर :**
लाभांश उत्पन्न सभासदांच्या हातात करपात्र आहे आणि कंपनीला आयकर कायदा, १९६१ ('आयकर कायदा') मध्ये निर्धारित दराने सभासदांना दिलेल्या लाभांशातून स्त्रोतावरील कर (टीडीएस) कापून घेणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे, टीडीएस आवश्यकतांचे पालन करण्यास सक्षम करण्यासाठी, सदस्यांना विनंती केली जाते की, त्यांनी त्यांचा निवासी दर्जा, पॅन आणि श्रेणी IT कायद्यानुसार त्यांच्या डीपीसह पूर्ण करा आणि/किंवा अद्ययावत करा. आवश्यक कागदपत्रे मंगळवार, ६ ऑगस्ट २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी कंपनी/रजिस्ट्रारला ईमेल आयडी : Oaldivtax@linkintime.co.in वर ई-मेलद्वारे सबमिट करणे किंवा https://liiplweb.linkintime.co.in/formsreg/submission-of-form-15g-15h.html या लिंकला भेट देऊन ते अपडेट करणे.

ओरिएंटल एरोमॅटिक्स लिमिटेडकरिता
सही/-
किरणप्रीत गील
कंपनी सचिव

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०५.०७.२०२४